# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/१३-विवि/**१९१**/२०२२

दिनांक : १४.१२.२०२२

प्रति,

**मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,**
संलग्नित संबंधित महाविद्यालये व
पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : कौशल्य विकास योजनेअंतर्गत विद्यापीठाच्या मानव संसाधन विकास केंद्र यामधून प्रशिक्षित झालेले प्रशिक्षक यांच्या एक दिवसीय कार्यशाळेला उपस्थित राहणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विनियम क्र.१२/२०१९ अंतर्गत कौशल्य विकास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरीता विद्यापीठाच्या मानव संसाधन विकास केंद्र यामधून प्रशिक्षित झालेले शिक्षक यांना पाठविण्याबाबत तरतुद आहे. त्यानुसार सत्र २०२२-२०२३ मध्ये राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास योजनेच्या तयारी संदर्भात चर्चा करण्याकरीता प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षकांची एक दिवसीय कार्यशाळा **दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता** मा.कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली स्व.डॉ.के.जी.देशमुख सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे आयोजन करण्यात आलेले आहे.

या आयोजित कार्यशाळेत कौशल्य विकास योजनेच्या तयारी संदर्भात व आवश्यक मार्गदर्शनाकरीता चर्चा होणार आहे. करीता आपल्या महाविद्यालयातील कौशल्य विकास योजनेचे समन्वयक व प्रशिक्षक यांना सदर कार्यशाळेला उपस्थित राहणेबाबत कृपया सूचित करावे, ही विनंती. **सदर कार्यशाळेला येण्या-जाण्याचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देय राहणार नाही. याची नोंद घ्यावी.**

आपला विश्वासू,

**(डॉ. राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी :

१) मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२) प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
३) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
४) प्र.संचालक, युजीसी-मानव संसाधन विकास केंद्र (एच.आर.डी.सी.)
५) संबंधित समन्वयक व प्रशिक्षक, कौशल्य विकास योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ